ePaper

संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटीची स्थापना

वर्ष - 8 I अंक -173 UDYAM-MH-26-0158827




महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 2 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- एकच चेंडू पण दोनदा झाला आऊट
- रोहितच्या पोस्टने वेधले लक्ष!
- पुरुषांनी शर्ट काढून मंदिरात जाणे वाईट
- अमेरिकेत दहशतवादी हल्ला!

### आकाशी निळे झेंडे, हाती मशाल, मुखी 'जय भीम'चा नारा

# कोरेगाव भीमा येथे लाखोंचा जनसागर!

### जिल्हा प्रशासन व पोलीस यंत्रणा यांच्या नियोजनामुळे शौर्यदिन मानवंदना कार्यक्रम शांततेत

**I पुणे I महाईन्यूज**

**कोरेगाव भीमा येथील विजयस्तंभास मानवंदना देण्यासाठी आलेल्या लाखोंच्या जनसमुदायाच्या मुखात 'जय भीम-जय भीम' चा नारा होता. तरुणवर्ग हातामध्ये निळे झेंडे घेत जोरदार घोषणाबाजी करीत होते. आज लाखोंचा जनसमुदाय मानवंदना व अभिवादन करण्यासाठी येत असताना जिल्हा प्रशासन व पोलीस यंत्रणा यांच्या नियोजनामुळे शौर्यदिन मानवंदना कार्यक्रम शांततेत पार पडला.**



केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, खासदार सुनेत्रा पवार, क्रिडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, समाजकल्याण राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माजी खासदार छत्रपती संभाजीराजे भोसले, आमदार ज्ञानेश्वर कटके, बापुसाहेब पठारे, संजय बनसोडे, नितीन राऊत, राजकुमार बडोले वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर, रिपब्लीकन पिपल पार्टि जोगेंद्र कावडे, बामसेफचे वामन मेश्राम, भीमराज आंबेडकर, भीम आमीर्चे संस्थापक चंद्रशेखर आझाद, शिवसेना नेत्या सुषमा अंधारे, माजी आमदार प्रकाश गजभिये, यांसह अनेक आदींनी सदर ठिकाणी अभिवादन केले.

राज्यभरासह उत्तर प्रदेश , मध्यप्रदेश ,गुजरात ,तेलंगना,हरियाना , कर्नाटकसह यावर्षी परदेशातुनही मोठ्या प्रमाणावर आंबेडकरी समाज विजयस्तंभाजवळ एकवटला होता. या नागरिकांमध्ये उत्साह भरण्याचे काम जागोजागी शाहिरी जलशाच्या माध्यमातुन केले जात होते. भारत मुक्ती मोर्चा, रिपब्लिकन सेना, आरपीआय, भारतीय बौध्द महासभा, दलीत पँथर, यासह अनेक सामाजिक संघटनांच्या वतीने मानवंदना देण्यात येत असताना आंबेडकरी चळवळीची आणि सामाजिक विषमतेवर सडेतोड भाष्य करणारी गित याठिकाणी साजरी केली जात होती. या सोबतच मराठवाडा, विदर्भातुन आलेले कलाकार रस्त्याच्या कडेला, झाडाखाली सावलीत बसून प्रभोधनात्मक गाणी सादर करत होते.

## गर्दीचा उच्चांक

कोरेगाव भीमा येथे मंगळवार रात्रीपासून सुरु असलेला गर्दीचा ओघ बुधवारी पहाटेपासूनच वाढायला सुरुवात झाली होती. अंदाजे १४ ते १५ लाख लोक अभिवादनासाठी याठिकाणी आले होते. पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या ६३० बस सोडल्याने विजयस्तंभास मानवंदना येथे येणा-या नागरिकांची सोय झाली.

## एनडीआरएफचे जवान तैनात

कोरेगाव भीमा येथिल पुणे-नगर महामार्गावरील दुतर्फा असलेल्या पुलावर मोठी गर्दि झाल्याने कोणताही अनुचीत प्रकार घडू नये यासाठी एनडीआरएफचे जवान तैणात करण्यात आले असुन ते सतत भीमा नदीपात्रातून आपल्या पाणीबुडीतुन लक्ष ठेवण्यात आले.

## महार रेजिमेंटची सलामी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९२७ साली विजयस्तंभास मानवंदना देण्यासाठी आल्यानंतर त्यांनी महार रेजीमेंटची स्थापना करण्याची मागणी स्तंभावरुनच केली होती. या घटनेच्या कृतज्ञता म्हणूण दरवर्षी १ जानेवारीला विजयस्तंभास महार रेजीमेंटच्या निवृत्त जवानांच्यावतीने मानवंदना देण्यात येत असते. यावर्षी पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या उपस्थितीत दिलेली मानवंदना विशेष आकर्षण ठरले.

## नागरिकांच्या तक्रारीसाठी नियंत्रण कक्ष

कोरेगाव भीमा व विजयस्तंभाजवळ पोलीस नियंत्रण कक्ष उभारल्यामुळे गर्दित हरवले-सापडले यासाठी चांगला उपयोग होत होता. अनेक लहान मुले , मोबाईल , पाकिट सापडलेली या कक्षात पोलीस ज्यांचे आहेत त्यांना देत होती. तसेच समता सैनिक दलाचे २ हजार जवान देखील पोलीसांना मदत करत असतानाच पोलीसांच्या मदतीला असलेले शांतीदुत देखील गर्दिला दिशादर्शक व मदत करण्यास उपयोगी पडत होते.

# कराड याला कठोर शिक्षा झाली पाहिजे!

## 14 दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली : रामदास आठवले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. या हत्येमागे वाल्मिक कराडचं नाव समोर आल्यानंतर तब्बल 20 दिवस वाल्मिक कराड फरार होते.काल पुण्यातील सीआयडी कार्यालयात हजर झाले आणि काल रात्री उशिरा बीड येथील केज न्यायालयात हजर करण्यात आले.**



त्यावेळी बराच काळ दोन्ही बाजूने युक्तिवाद झाल्यानंतर सरकारी वकिलांची मागणी मान्य करीत वाल्मिक कराड यांना 14 दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.त्यानंतर अनेक राजकीय प्रतिक्रिया येण्यास सुरुवात झाली.त्याच दरम्यान केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले हे पुणे दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधी सोबत संवाद साधत अनेक घडामोडी बाबत भाष्य केले. बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्ये मागे वाल्मिक कराड असल्याचा आरोप असून आता पोलिसांनी अटक केली आहे.त्या रामदास आठवले म्हणाले की, बीड येथील संतोष देशमुख यांची क्रूरपणे हत्या करण्यात आली आहे.त्या घटनेच्या पार्श्वभूमीवर संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली आहे.माणुसकीला कलंक लावणारी घटना घडलेली आहे. तसेच या प्रकरणातील संशयित आरोपी वाल्मिक कराड हा तब्बल 20 दिवसानंतर स्वतः हून पोलिसांसमोर हजर झालेला आहे. तसेच आतपर्यंत चार आरोपींना अटक करण्यात आली असून अन्य तीन आरोपींना लवकरात लवकर पोलिसांनी अटक करावी,त्याचबरोबर संतोष देशमुख यांच्या हत्येचा मुख्य सूत्रधार वाल्मिक कराड असून त्याच्यावर कडक कलम लावून शिक्षा झाली पाहिजे,अशी मागणी सुरवातीपासून सर्वांची आहे.आता वाल्मिक कराड कोठडीमध्ये असून त्या प्रकरणाची चौकशी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.तसेच ते पुढे म्हणाले की, बीड जिल्ह्यात गुंडागर्दी करणारी, खंडणी मागणारी जी टोळी आहे. तसेच उद्योग व्यवसाय करणाऱ्या लोकांना त्रास देणारे जे लोक आहेत. त्या ठिकाणी खंडणी मागण्यासाठी टोळी घेऊन फिरण,त्यामुळे ही बाब गंभीर असून अशा लोकांना कडक शासन झाल पाहिजे.तसेच त्या जिल्ह्यात वाल्मिक कराड हा कार्यकर्त्यांच्या नावाने गुंडगिरी करणारा आहे.आता त्याला अटक करण्यात आली असून त्याला शिक्षा झालीच पाहिजे.तसेच बीड जिल्ह्यात शांतता ठेवायची असल्यास,वाल्मिक कराड याला कठोर शिक्षा झाली पाहिजे आणि या प्रकरणात कोणीही राजकारण करू नये अशी भूमिका त्यांनी यावेळी मांडली.वाल्मिक कराड हे मंत्री धनंजय मुंडे यांचे मित्र आहेत. त्यामुळे धनंजय मुंडे मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी होत आहे.त्या प्रश्नावर रामदास आठवले म्हणाले की, वाल्मिक कराड हे धनंजय मुंडे यांचे मित्र होते. ही बाब जरी खरी असली तरी धनंजय मुंडे यांचा या प्रकरणाशी काही एक संबध नाही.

### रामदास आठवले पुणे दौऱ्यावर

माझ्या जवळचा कोणी ही असला तरी कारवाई करावी,अशी भूमिका धनंजय मुंडे यांनी यापुर्वी मांडली आहे.त्यामुळे धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची आवश्यकता नाही.बराच काळ दोन्ही बाजूने युक्तिवाद झाल्यानंतर सरकारी वकिलांची मागणी मान्य करीत वाल्मिक कराड यांना 14 दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.त्यानंतर अनेक राजकीय प्रतिक्रिया येण्यास सुरुवात झाली. त्याच दरम्यान केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले हे पुणे दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधी सोबत संवाद साधत अनेक घडामोडी बाबत भाष्य केले. बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्ये मागे वाल्मिक कराड असल्याचा आरोप असून आता पोलिसांनी अटक केली आहे.त्या रामदास आठवले म्हणाले की, बीड येथील संतोष देशमुख यांची क्रूरपणे हत्या करण्यात आली आहे.त्या घटनेच्या पार्श्वभूमीवर संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली आहे.

# थकबाकीदारांची आता नळजोड-तोडणी

## मिळकतकर वसूल करण्यासाठी पालिकेची आता कठोर भूमिका

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**थकीत मिळकतकर वसूल करण्यासाठी महापालिकेने आता कठोर भूमिका घेतली आहे. त्यानुसार नववर्षाच्या पहिल्या दिवसापासून थकबाकीदार मिळकतदारांच्या मिळकतींचे नळजोड तोडण्यात येणार असून, त्यासाठी परिमंडळनिहाय पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.**




मिळकतकर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत आहे. महापालिकेच्या अर्थसंकल्पात करआकारणी आणि करसंकलन विभागाकडून २ हजार ७२७ कोटी रुपयांच्या मिळकतकराचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मात्र, मिळकतकराची थकबाकी सुमारे दहा हजार कोटींवर पोहोचली आहे. त्याशिवाय ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३४ गावांमधील मिळकतकर वसुलीला राज्य शासनाने स्थगिती दिल्याने महापालिकेला या गावांमधून मिळणाऱ्या सुमारे ४०० ते ५०० कोटींच्या महसुलावर पाणी सोडावे लागणार आहे.या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून उत्पन्नवाढीसाठी शहरातील थकबाकीदारांच्या वसुलीवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. २ डिसेंबरपासून थकीत मिळकतकर वसुलीवर भर देण्यात आला आहे. करवसुलीसाठी पाच पथके तयार करण्यात आली आहेत. त्यांच्यामार्फत थकबाकीदारांच्या घरासमोर बँडवादन केले जात आहे. तसेच थकबाकी असलेल्या निवासी, व्यावसायिक मिळकतींना दररोज भेट देऊन जप्तीची कारवाई केली जात आहे.

आतापर्यंत या पथकांनी ७१ कोटी ४१ लाख ८५ हजार ३९३ रुपयांचा थकीत कर वसूल केला आहे. महापालिकेतर्फे एक एप्रिलपासून मिळकतकराची देयके पाठवली जातात. आर्थिक वर्ष संपण्यास तीन महिने बाकी आहेत. मात्र, अद्यापही काही नागरिक, व्यावसायिकांनी मिळकतकर भरलेला नाही. त्यांचा नळजोड तोडण्याची कारवाई करण्यात येणार आहे. मध्यवर्ती वसुली पथकासोबत एक प्लंबर, तीन बिगारी, विभागीय निरीक्षक, पेठ निरीक्षक यांच्या पथकाद्वारे थकबाकीदारांच्या मिळकतीचे नळजोड एक जानेवारीपासून तोडण्यात येतील. संपूर्ण थकबाकी भरल्यानंतरच नळजोड पूर्ववत केले जातील. त्यामुळे मिळकतधारकांनी थकबाकी त्वरित भरावी, असे आवाहन विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी केले आहे.

### वसुलीवर लक्ष केंद्रित

महापालिकेच्या अर्थसंकल्पात करआकारणी आणि करसंकलन विभागाकडून २ हजार ७२७ कोटी रुपयांच्या मिळकतकराचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मात्र, मिळकतकराची थकबाकी सुमारे दहा हजार कोटींवर पोहोचली आहे. त्याशिवाय ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३४ गावांमधील मिळकतकर वसुलीला राज्य शासनाने स्थगिती दिल्याने महापालिकेला या गावांमधून मिळणाऱ्या सुमारे ४०० ते ५०० कोटींच्या महसुलावर पाणी सोडावे लागणार आहे.या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून उत्पन्नवाढीसाठी शहरातील थकबाकीदारांच्या वसुलीवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

## TO THE POINT : पिंपरी-चिंचवडमध्ये

# राष्ट्रवादी शरद पवार गटाला 'गळती'चा धोका!

## महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुकांची अस्वस्थता

### 'बॅक टू होम' साठी अनेकांची अजित पवार यांच्याकडे 'साखरपेरणी'

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विधानसभा निवडणुकीत शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी अशा तीनही मतदार संघात सपाटून मार खाल्ल्यानंतर राष्ट्रवादी शरद पवार गटातील अनेक महत्त्वाकांक्षी माजी नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे 'साखर पेरणी' सुरू केली आहे. महानगरपालिका निवडणुकीत आपली जागा 'सेफ' करण्याच्या उद्देशाने काही महत्त्वाकांक्षी मान्यवर आणि माजी नगरसेवक शरद पवार गटातून बाहेर पडण्याच्या तयारीत आहेत.**

लोकसभा निवडणुकीत राज्यात महाविकास आघाडीचा प्रमुख घटक पक्ष म्हणून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे लक्षवेधी कामगिरी केली. या निवडणुकीतील 'स्ट्राईक रेट' विधानसभा निवडणुकीत कायम राहील, या अपेक्षेने शहरातील अनेक मातब्बर इच्छुकांनी अजित पवारांची साथ सोडली आणि तिकिटही मिळवले.

भोसरी मतदार संघातून तब्बल ४० माजी नगरसेवकांची फौज सोबत घेवून अजित गव्हाणे यांनी 'तुतारी' खेचून आणली. तर पिंपरीत सुलक्षणा शिलवंत यांना पक्षनिष्ठा या मुद्यावर तिकिट मिळाले. अत्यंत चर्चेत असलेल्या चिंचवडच्या जागेच्या तिकिटासाठी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी त्यांचे मित्र व माजी नगरसेवक राहुल कलाटे यांची वर्णी लावली. या राजकीय घमासानमध्ये शहरातून शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि काँग्रेस यांना संधी मिळाली नाही.



### आमदार करणार विरोधकांचा 'करेक्ट कार्यक्रम'...

चिंचवडमध्ये सुमारे १ लाख ३ हजार ८७१ मतांनी, पिंपरीत ३६ हजार ६८८ मतांनी आणि भोसरी मतदार संघात ६३ हजार ७९१ मतांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या उमेदवारांचा पराभव झाला आहे. शहरातील तीनही मतदार संघांमध्ये मोठी ताकद आहे, असा केलेला दावा त्यामुळे फोल ठरला. महायुतीने तीनही जागांवर वर्चस्व मिळवले. हाच 'ट्रेंड' महानगरपालिका निवडणुकांमध्ये राहील. किंबहुना, राज्यात आणि केंद्रात महायुतीची निर्विवाद सत्ता असल्यामुळे महापालिकेत महायुती सत्तेत येणार, हे निश्चित मानले जात आहे. त्यामुळे 'तुतारी'मध्ये दाखल झालेले राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक पुन्हा अजित पवार यांच्याच्या गटात सामील होण्याच्या तयारीत आहेत. मात्र, महानगरपालिका निवडणुका स्वबळावर लढवल्यास या मान्यवरांना भाजपाशीच दोन हात करावे लगणार आहेत. त्यामुळे विद्यमान आमदार स्वत:च्या समर्थकांना तिकिटाला प्राधान्य देणार आणि विरोधात गेलेल्यांचा 'करेक्ट कार्यक्रम' करणार आहेत, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

### शहराध्यक्षपदाच्या बदलासाठी रस्सीखेच...!

"पदांशिवाय राहुच शकत नाहीत.." अशा मानसिकतेमुळे राष्ट्रवादी शरद पवार गटात दोन-तीन गट निर्माण झाले आहेत. आगामी महानगरपालिका निवडणुकीत आपल्या समर्थकांना ताकद द्यायची असेल, तर संघटनात्मक पातळीवर शहराध्यक्षपद आपल्या ताब्यात असायला हवे, असा काही नेत्यांचा मानस आहे. त्यातच, विधानसभा निवडणुकीत शहरामध्ये विद्यमान शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी लक्षवेधी कामगिरी केली नाही. त्यांच्याजागी अनुभवी आणि संघटन बांधणारा नेता असावा, असा 'मॅसेज' अगदी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यापर्यंत पोहोचवण्यात आला आहे. दुसरीकडे, कामठे यांनी पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्याकडे " मला पदमुक्त करावे आणि प्रभागात काम करण्यासाठी ताकद द्यावी" अशी मागणी केल्याचे सांगितले जाते. चिंचवडमधून राहुल कलाटे आणि भोसरीतून अजित गव्हाणे समर्थक शहराध्यक्षपद खेचून आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

---

# इंद्रायणी साहित्य संमेलनाचे श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते उद्घाटन

## दादाभाऊ गावडे संमेलनाध्यक्ष तर वंदना आल्हाट स्वागताध्यक्ष

। पिंपरी।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मोशी येथे इंद्रायणी साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या इंद्रायणी साहित्य संमेलनाचे उद्घाटन रविवारी (दि.५ ) सकाळी आठ वाजता, देहू आळंदी रस्त्यावरील कवयित्री बहिणाबाई चौधरी साहित्य नगरी, जय गणेश बँक्वेट हॉल, मोशी येथे होणार आहे.**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक दादाभाऊ गावडे संमेलनाध्यक्ष पद भूषवणार आहेत. तर स्वागत अध्यक्ष म्हणून वंदना हिरामण आल्हाट यांची निवड करण्यात आली आहे अशी माहिती इंद्रायणी साहित्य परिषदेचे अध्यक्ष संदीप तापकीर, सचिव रामभाऊ सासवडे आणि निमंत्रण अरुण बोऱ्हाडे यांनी दिली.

बुधवारी मोशी नागेश्वर मंदिर, येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेस उपाध्यक्ष डॉ. सीमा काळभोर, कार्याध्यक्ष सोपान खुडे, सदस्य डॉ. पौर्णिमा कोल्हे, एव्हरेस्टवीर श्रीहरी तापकीर व इतर सदस्य उपस्थित होते.

उद्घाटनापूर्वी श्री नागेश्वर महाराज मंदिर ते कवयित्री बहिणाबाई चौधरी साहित्य नगरी (संमेलन स्थळ) पर्यंत सकाळी आठ वाजता ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. या ग्रंथदिंडीचे उद्घाटन विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूरचे सदस्य ॲड. माधवी निगडे यांच्या हस्ते होणार आहे. या संमेलनास संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. शिवाजीराव मोहिते, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या प्रमुख कार्यवाहक सुनिताराजे पवार, शिवछत्रपती पुरस्कार विजेते डॉ. अरुण दातार, आमदार महेश दादा लांडगे, आमदार बाबाजी काळे आदी प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत.

यावेळी आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते अक्षर इंद्रायणी या स्मरणिकेचे आणि काल भवताल या कथासंग्रहाचे श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात येणार आहे. तसेच इंद्रायणी साहित्य परिषदेचा यशवंतराव चव्हाण प्रज्ञावंत साहित्य पुरस्कार डॉ. श्रीपाल सबनीस यांना प्रदान करण्यात येणार आहे. आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते "स्वातंत्र्यसंग्रामातील समिधा" या क्रांतिकारकांच्या छायाचित्रांचे प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. सकाळी दहा वाजता "ज्ञानेश्वरी – काळाची गरज" या परिषदेचे उद्घाटन डॉ. आरती दातार यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या परिसंवादात संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक हभप डॉ. नारायण महाराज जाधव, हभप ॲड. यशोधन महाराज साखरे, योगी निरंजनाथ गुरु शांतिनथ, ज्ञानेश्वरीचे ज्येष्ठ अभ्यासक रामदास जैद आदी सहभाग घेणार आहेत. या परिसंवादाचे सूत्रसंचालन प्रा. दिगंबर ढोकले तर समन्वयक म्हणून डॉ. सीमा काळभोर काम आहे.

दुपारी दोन वाजता संमेलनाध्यक्ष दादाभाऊ जयवंत गावडे यांची ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र घावटे प्रकट मुलाखत घेणार आहेत. दुपारी तीन वाजता, डॉ. सदानंद मोरे यांची संदीप तापकीर प्रकट मुलाखत घेणार आहेत. सायंकाळी पाच वाजता "दुर्ग भटकंती" या अरुण बोराडे यांनी लिहीलेल्या पुस्तकाचे प्रकाशन निवृत्त आयपीएस अधिकारी डॉ. माधवराव सानप यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यानंतर समारोप सत्रात ज्येष्ठ उद्योजक रामदास काकडे यांच्या हस्ते भूमिपुत्र पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे.

यावेळी लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रभाकर ओव्हाळ, महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड अध्यक्ष राजन लाखे, सूत्रसंचालक श्रीकांत चौगुले आदी उपस्थित राहणार आहेत. यावेळी वैद्यकीय सेवा डॉ. अनिल कुमार रोडे, प्रशासन सेवा कार्य संजय गोपाळ शिंदे, इतिहास संशोधन दत्तात्रय दगडू फुगे, अग्निशमन सेवा कार्य सुनील तानाजी गिलबिले, प्रशासकीय सेवा परीक्षा स्मिता प्रतीक थोरवे, प्रो कबड्डी खेळाडू अनुज काळूराम गावडे, वैद्यकीय संशोधन कार्य डॉ. मधुरा मल्हारी काळभोर, युवा कीर्तनकार हभप विठ्ठल महाराज गवळी, हभप संग्राम बापू भंडारे, हभप मंगेश महाराज सावंत, साहित्य व समाजसेवा दत्तात्रय विघ्नहर अत्रे, सीए परीक्षा उत्तीर्ण सम्यक राहुल धोका आणि सिद्धांत राहुल धोका आदींना "भूमिपुत्र पुरस्कार २०२४" देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

### यांची उपस्थिती राहणार...

सायंकाळी ७:३० वाजता, शिवांजली साहित्य परिषदेचे प्रवर्तक शिवाजीराव चाळक यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कवी संमेलन होणार आहे. यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक सुरेश कंक, संतोष घुले, समन्वयक डॉ. पौर्णिमा कोल्हे आदी उपस्थित राहणार आहेत अशी माहिती इंद्रायणी साहित्य परिषदेच्या वतीने प्रसिद्धीस देण्यात आली आहे.

# उद्धव ठाकरे यांची अवस्था जत्रेत चुकलेल्या मुलासारखी !



**महाराष्ट्रातील राजकारण पाहिलं तर दोन मुद्दे प्रामुख्यानं विचारात घ्यायला हवेत. पहिला म्हणजे राजकारणात कुणी कुणाचं नसतं.. अन् दुसरा म्हणजे कुणी कितीही फुशारक्या मारल्या, तरी तुमची लायकी जनता ठरवते ! आज महाराष्ट्रातल्या राजकारणात जे उलटफेर पाहायला मिळतात, त्याचा अर्थ समजावून घेणं अत्यंत महत्त्वाचं आहे.**



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

गेली अडीच वर्षे आणि विशेषतः लोकसभा निवडणुकीनंतर ज्या देवेंद्र फडणवीस यांचा उद्धार अगदी खालच्या थरावर जाऊन सर्व विरोधकांनी केला, त्याच फडणवीस यांना जनतेनं महाराष्ट्रातील सर्वोच्च प्रेम आणि आदर दिलाय.. आज ते प्रचंड बहुमत घेऊन मुख्यमंत्रीपदावर बसले आहेत.. ध्रुवबाळाप्रमाणं त्यांचं स्थान आता पाच वर्षे अढळ आहे ! याउलट, ज्यांनी उसन्या ताकदीच्या जोरावर दंडाच्या बेटकुळ्या फुगवल्या होत्या, त्या उद्धव ठाकरे आणि शरद पवार गटालाही जनतेनं जागा दाखवून दिली आहे. दुर्दैव असं की त्यांची तर अस्तित्वासाठी लढाई सुरू आहे. ऊठसूठ देवेंद्र फडणवीस यांचा राजीनामा मागण्याचा सपाटा शरद पवार गटाच्या नेत्या सुप्रिया सुळे, जयंत पाटील, रोहित पवार, जितेंद्र आव्हाड यांनी लावला होता. पण, मतदार राजा सर्वश्रेष्ठ असल्यामुळं त्यांचे दहा आमदार सुद्धा निवडून आले नाहीत. जनतेनं पार सुपडा साफ केला. तिकडं उबाठा गटाची अवस्था तर जत्रेत चुकलेल्या एखाद्या हट्टी मुलासारखी झालीय. दिशा दाखवणारे पालक नाहीत, आई-वडील सापडत नाहीत, स्वतःचं नाव सांगता येत नाही, केवळ आक्रोश करून दिशा शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे.

### शिवीगाळ,टोमणे आणि खालची भाषा!

गेली अडीच वर्षे उद्धव ठाकरे यांच्या शिल्लक सेनेनं एकनाथ शिंदे आणि फडणवीस यांना 'लक्ष्य' केलं होतं. स्वतः उद्धव ठाकरे आणि त्यांचे प्रवक्ते संजय राऊत यांनी नको, नको ती भाषा वापरून फडणवीस यांना अक्षरशः शिवीगाळ केली. पण, जनतेला हे देखील पटलं नाही. विधानसभा निवडणुकीत या उबाठा गटाला मतदारांनी चक्क तोंडावर पाडलं. साधं विरोधी पक्षनेतेपद सुद्धा त्यांना मिळालं नाही. त्यासाठी पुन्हा फडणवीस यांचेच पाय धरण्याची वेळ उद्धव ठाकरे यांच्यावर आली, हे सर्वांनीच पाहिलं !

आत्ताच्या निवडणुकीनंतर केंद्रात आणि महाराष्ट्रात पाच वर्षे भक्कम सरकार आल्याचं वास्तव पुढं आलं आहे आणि सोनिया काँग्रेस, शरद पवार गट आणि उद्धव ठाकरे गट हे सत्तेशिवाय राहू शकत नाहीत, याचा अनुभव संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेनं घेतला आहे. भाजपाबरोबर युती असताना आणि बहुमत मिळालं असताना २०१९ मध्ये वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या तत्त्वांना, भूमिकेला आणि हिंदुत्ववादाला सोडचिठ्ठी देऊन केवळ मुख्यमंत्रीपदासाठी उद्धव ठाकरे यांना दोन्ही काँग्रेसच्या मांडीवर जाऊन बसलेलं जनतेनं पाहिलं आहे. दुसरीकडं भाजपाद्वेषानं पछाडलेल्या नाना पटोले यांची काँग्रेस आणि शरद पवारांची काँग्रेस नीतिमत्ता सोडून उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी उभी राहिल्याचंही पाहिलं आहे. याचा नेमका तडाखा मतदारांनी दिला आणि 'महायुती' ला भरभरून मतदान केलं, हा इतिहासही ताजा आहे.

### उबाठा गट ..ना घरका, ना घाटका !

या सगळ्या समुद्रमंथनामध्ये सर्वात मोठा फटका बसला, तो उद्धव ठाकरे गटाला. एक तर त्यांचा सर्व पक्ष घेऊन, पक्षाचं नाव-चिन्ह घेऊन आणि वंदनीय बाळासाहेबांचे विचार घेऊन एकनाथ शिंदे निघून गेले. उरलेला तोडका मोडका पक्ष घेऊन त्याची उभारणी करण्याऐवजी त्याची सूत्रं संजय राऊत आणि सुषमा अंधारेंसारख्या अपरिपक्व आणि बेछूट प्रवक्त्यांच्या हाती गेली. त्यांनी विरोधकांना फक्त शिवीगाळ करणे, टोमणे मारणे यामध्ये अडीच वर्षे घालवली. महाराष्ट्राचा विकास कसा करणार? महाराष्ट्राबाबतची दूरदृष्टी नाही, कोणतेही ठोस काम किंवा आश्वासन नाही.. फक्त एकनाथ शिंदे सरकारच्या प्रत्येक प्रकल्पावर विरोधी वक्तव्य करणे, त्यांना स्थगिती आणणे किंवा अर्वाच्य भाषेत उद्धार करणे.. असलं खालच्या थराचं राजकारण केल्याचा परिणाम उबाठा गट भोगत आहे.

बरं, हे दोन्ही प्रवक्ते उद्धव ठाकरे यांच्या शिल्लक सेनेची भूमिका मांडत होते का? याचं उत्तर "मुळीच नाही", असंच द्यावं लागेल. संजय राऊत रोज सकाळी उठल्यावर समाज माध्यमांसमोर येऊन जी बाष्कळ बडबड करत होते, त्याचा फटका फक्त उबाठा गटाला बसला नाही, तर शरद पवार गट आणि काँग्रेस यांनाही आपल्याबरोबर उद्ध्वस्त करण्याचं काम त्यांनी केलं. उद्धव ठाकरे यांच्या शिल्लक पक्षाची भूमिका मांडण्याऐवजी ते रोज काँग्रेसची आणि शरद पवार गटाची भूमिका मांडत होते, आणि उद्धव ठाकरे गट कसा दिशाहीन आहे, या दोघांच्यावर कसा अवलंबून आहे, हे सांगत होते, हे काय जनतेला समजत नव्हतं काय ? संजय राऊत हे शरद पवार गटाचे प्रवक्ते होते का काँग्रेसचे.. याचं उत्तरही स्वतः उद्धव ठाकरे देऊ शकणार नाहीत. यामुळं झालं काय, आता काँग्रेस आणि शरद पवार गट हे आपल्या अपयशाचं खापर उबाठा गटावर फोडायला लागले आहेत. ते दोघेही भाजपाशी जुळवून घेऊ शकतात. पण, उबाठा गटानं भाजपाला आणि एकनाथ शिंदे यांना एवढं दुखावलं आहे, की त्यांच्याशी जुळवून घेण्यासाठी ते गेले, तरी त्यांना जवळ घेण्याची मानसिकता भाजपाकडं नाही. दुसऱ्या प्रवक्त्या सुषमा अंधारे या देवदेवतांबरोबरच वंदनीय शिवसेनाप्रमुखांचा अवमान करण्यात आयुष्य घालवलेल्या ! त्यांना आपल्या पक्षात घेऊन प्रवक्तेपद देण्याची चूक फक्त उद्धव ठाकरे यांच्यासारखा माणूसच करू शकतो. त्यांनी माध्यमांसमोर ज्या ज्या वेळी भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला, त्या त्या वेळी त्या मार्क्सवाद किंवा शहरी नक्षलवाद याची पाठराखण करत बसल्या, हे आता लपून राहिलेलं नाही.

### आधुनिक शकुनी आणि मंथरा एकत्र

आता, मूळ मुद्द्याकडं परत येऊ. संजय राऊत काँग्रेसची भूमिका मांडणार आणि सुषमा अंधारे नेहमीच मार्क्सवाद किंवा नक्षलवाद्यांची बाजू घेणार.. मग, उद्धव ठाकरे गटाची बाजू मांडायलाच सगळे विसरले.. आणि होणारा परिणाम झाला. या दोघांच्या रूपानं आधुनिक शकुनीमामा आणि मंथरा एकत्र झाले, त्यामुळं राजकीय सारीपाटावर उद्धव ठाकरेंचे उंट, हत्ती, घोडे भरकटले आपली भूमिका आणि चालच विसरले. बुद्धिबळात एकटा राजा असून उपयोग नसतो, तर त्याला खंबीर साथ देणारा वजीर लागतो..उद्धव ठाकरे यांच्याकडे नेमकी वजीराची वानवा होती, आणि त्याचे परिणाम ते भोगत आहेत. जत्रेत चुकलेल्या मुलाची उपमा एवढ्यासाठी द्यावी वाटते , की त्याला दिशा समजत नाही..आई-वडिलांचा हात सुटल्यामुळं हिंदुत्व दूर पळालं आहे, आणि ज्यांच्याकडे पालकत्व दिलं होतं, त्यांनी भरकटवून ठेवलं आहे, दिशाहीन करून टाकलं आहे.

### उद्धव ठाकरेंचं नशीबच फुटकं!

त्यातच आज एक अतिशय भयावह बातमी येऊन धडकली आहे. या बातमीचा पुरावा अद्याप मिळाला नाही. पण, भाऊ तोरसेकर यांच्यासारख्या ज्येष्ठ संपादक- पत्रकाराने त्यांच्या सूत्रांचा हवाला दिला आहे. त्याचं काय झालं.. मुंबई महानगरपालिकेसाठी व्यूहरचना करण्याच्या दृष्टीनं उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या 'मातोश्री' या निवासस्थानी मुंबईतील पदाधिकाऱ्यांची आणि काही आमदारांची बैठक बोलावली होती. त्यात प्रचंड राडा झाला. संतप्त कार्यकर्त्यांनी विधानसभा पराभवाचं खापर संजय राऊत यांच्यावर फोडलं, त्यांना मारहाण केली आणि तीन तास एका खोलीमध्ये डांबून ठेवलं.. ही तेथील ठराविक कार्यकर्त्यांची मानसिकता नाही, तर वंदनीय बाळासाहेबांना मानणाऱ्या प्रत्येक शिवसैनिकाची ती भावना आहे, 'मातोश्री' वर ती प्रकट झाली एवढेच ! यापेक्षा, उद्धव ठाकरे यांना धक्का देणारी दुसरी मोठी घटना म्हणजे मुंबईचे काही माजी नगरसेवक आणि पुण्याचे काही माजी नगरसेवक उद्धव ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देऊन दुसऱ्या पक्षांमध्ये प्रवेश करीत आहेत ! उद्धव ठाकरे यांची दशा 'असंगाशी संग' अशी झाली असून आपल्या अश्वमेधाची सूत्रं नको त्या सारथ्याकडं दिली, तर त्याचे परिणाम काय होतात, अशी झाली आहे. 'बुडत्याचा पाय खोलात' अशी अवस्था झालेले उद्धव ठाकरे दिवसेंदिवस जास्तीत जास्त गाळात चालले आहेत, चुकीचे सल्ले ऐकून स्वतःच्या पायावर दगड मारून घेत आहेत. त्यांना सावरण्याची कुवत ना आदित्य ठाकरेंमध्ये आहे, ना वरूण सरदेसाईंमध्ये ! बाकीची शिल्लक मंडळी, आपल्या घसरगुंडीचं खापर शकुनी-मंथरा जोडीवर फोडून संधी मिळाली की दुसऱ्या पक्षात हळूच उडी मारणार आहेत. पण, हे समजून घेण्याची इच्छा उद्धव ठाकरे यांची आहे का? हा खरा प्रश्न आहे. एवढं सगळं रामायण, महाभारत घडल्यानंतर उद्धव ठाकरे यांचे डोळे आता तरी उघडतील आणि 2019 उचललेली पावले चुकीची होती, हे त्यांनी मान्य करावे आणि त्याचे समर्थन करण्यात आपण पाच वर्षे फुकट घालवली, हे शिल्लक सहकाऱ्यांना समजावून सांगावे. अजूनही विधानसभेत आणि त्या आधारावर महाराष्ट्रात मुख्य विरोधी पक्ष होण्याची त्यांना संधी आहे. त्याचप्रमाणे ते अजूनही मुंबई महानगरपालिका जिंकू शकतील. ज्यांनी चुकीच्या मार्गाने नेले त्यांना बाजूला करून निवडणुकीसाठी पुन्हा सज्ज व्हावे. राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट कधीही एकीकरणाची घोषणा करु शकतात, हे लक्षात ठेवावे. शरद पवार यांचा टेकू उपयोगाचा नाही, भरवशाचा मुळीच नाही.. एवढे ज्या दिवशी उद्धव ठाकरे यांच्या लक्षात येईल, त्या दिवशी त्यांचा अनुकूल काळ सुरु होईल. सध्या मात्र त्यांच्या गटाची अवस्था, फार विचित्र झाली आहे, हे कोणाच्याही लक्षात येईल, हे नक्की!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कराड याला मास्क लावण्याची वेळ!

## सीआयडीने आणखी तीन लोकांना चौकशीसाठी समन्स बजावले

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने संपूर्ण राज्यात संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी अशी मागणी सर्व स्तरातून केली जात आहे. यादरम्यान महाराष्ट्र सरकारने मोठा निर्णय घेत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या तपासासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केली आहे.**



संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा सध्या सीआयडीकडून तपास सुरू असून आतापर्यंत दीडशेहून अधिक जाणांची या प्रकरणात चौकशी करण्यात आली आहे. या प्रकरणात दोन कोटींची खंडणी आणि हत्या या दोन्हींच्या संबंधाच्या अनुषंगाने तपास केला जात आहे. दरम्यान या प्रकरणात सीआयडीने आणखी तीन लोकांना चौकशीसाठी समन्स बजावले आहे. पण हे तीन जण कोण आहेत? याबद्दलची माहिती अद्याप उघड करण्यात आलेली नाही. या हत्या प्रकरणातील काही आरोपी अद्यापही फरार आहेत, त्यांचा देखील शोध सीआयडीकडून घेतला जात आहे. पीटीआयने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. या प्रकरणात आरोप होत असलेला वाल्मिक कराड हा पुणे येथे पोलिसांना शरण आला आहे. त्याच्याविरोधात खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला बीडमधील केजच्या न्यायालयाने १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. राज्य सरकारने आरोपी वाल्मिक कराड याला पकडण्यासाठी त्याचे आर्थिकदृष्ट्या नाक आणि तोंड दाबण्याचा प्रयत्न केला. राज्य सरकारने त्याची संपत्ती जप्त केली. तसेच बँक खाते देखील गोठवले. यानंतर वाल्मिक कराड हा सीआयडीला शरण आला. विशेष म्हणजे गेल्या 22 दिवसांत वाल्मिक कराड हा मध्य प्रदेश, गोवा आणि कर्नाटक या राज्यांमध्ये फिरला. यानंतर तो महाराष्ट्रात पुण्यात आला. तो त्याच्या समर्थकांसह पुण्यात सीआयडी कार्यालयात सरेंडर होण्यासाठी काल दाखल झाला. त्याच्या समर्थकांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या. अखेर सीआयडी तपासातून कराड हा तीन राज्ये फिरल्याची माहिती समोर आली. आयपीएस बसवराज तेली यांच्या नेतृत्वात एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. बसवराज तेली सीआयडीमधील आर्थिक गुन्हे शाखेचे प्रमुख आहेत. या समितीत 9 पोलीस अधिकारी आहेत. एसआयटीमध्ये सर्वच अधिकारी बीड जिल्ह्यातले आहेत. सध्याचे तपास अधिकारी डीवायएसपी अनिल गुजर हेही तपास पथकात असणार आहेत. अनिल गुजर, पोलीस उप अधीक्षक, विजयसिंग शिवलाल जोनवाल, स. पो. निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बीड; महेश विघ्ने, पो. उ. निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बीड; आनंद शंकर शिंदे, पो. उ. निरीक्षक, केज; तुळशीराम जगताप, सहा. पो. उ.निरीक्षक; मनोज राजेंद्र वाघ, पोलीस हवालदार; चंद्रकांत एस. काळकुटे, पोलीस नाईक; बाळासाहेब देविदास अहंकारे, पोलीस नाईक; संतोष भगवानराव गित्ते, पोलीस शिपाई. संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा सध्या सीआयडीकडून तपास सुरू असून आतापर्यंत दीडशेहून अधिक जाणांची या प्रकरणात चौकशी करण्यात आली आहे. या प्रकरणात दोन कोटींची खंडणी आणि हत्या या दोन्हींच्या संबंधाच्या अनुषंगाने तपास केला जात आहे. दरम्यान या प्रकरणात सीआयडीने आणखी तीन लोकांना चौकशीसाठी समन्स बजावले आहे. पण हे तीन जण कोण आहेत? याबद्दलची माहिती अद्याप उघड करण्यात आलेली नाही. या हत्या प्रकरणातील काही आरोपी अद्यापही फरार आहेत, त्यांचा देखील शोध सीआयडीकडून घेतला जात आहे. पीटीआयने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. या प्रकरणात आरोप होत असलेला वाल्मिक कराड हा पुणे येथे पोलिसांना शरण आला आहे. त्याच्याविरोधात खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला बीडमधील केजच्या न्यायालयाने १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. राज्य सरकारने आरोपी वाल्मिक कराड याला पकडण्यासाठी त्याचे आर्थिकदृष्ट्या नाक आणि तोंड दाबण्याचा प्रयत्न केला. राज्य सरकारने त्याची संपत्ती जप्त केली. तसेच बँक खाते देखील गोठवले.

### या समितीत 9 पोलीस अधिकारी

वाल्मिक कराड हा सीआयडीला शरण आला. विशेष म्हणजे गेल्या 22 दिवसांत वाल्मिक कराड हा मध्य प्रदेश, गोवा आणि कर्नाटक या राज्यांमध्ये फिरला. यानंतर तो महाराष्ट्रात पुण्यात आला. तो त्याच्या समर्थकांसह पुण्यात सीआयडी कार्यालयात सरेंडर होण्यासाठी काल दाखल झाला. त्याच्या समर्थकांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या. अखेर सीआयडी तपासातून कराड हा तीन राज्ये फिरल्याची माहिती समोर आली. आयपीएस बसवराज तेली यांच्या नेतृत्वात एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. बसवराज तेली सीआयडीमधील आर्थिक गुन्हे शाखेचे प्रमुख आहेत. या समितीत 9 पोलीस अधिकारी आहेत. एसआयटीमध्ये सर्वच अधिकारी बीड जिल्ह्यातले आहेत.

# नक्षलवादी चळवळीला मोठा हादरा!

## नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी 11 नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी नक्षलवादी चळवळीला मोठा हादरा बसला. जहाल नक्षलवादी, दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीची सदस्य आणि नक्षल्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य भूपती याची पत्नी विमला सिडाम उर्फ तारक्का हिच्यासह ११ नक्षलवाद्यांनी बुधवारी गडचिरोली पोलीस मुख्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले.**

१ डीकेएसझेडसीएम, ३ डीव्हीसीएम, २ एसीएम व ४ दलम सदस्यांचा समावेश आहे. या सर्वांवर एकूण ८६ लाख ५ हजार रुपयांचे बक्षीस होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षल्यांना संविधानाची प्रत देऊन त्यांचा सत्कार केला. दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीची सदस्य तारक्का ही मागील ३८ वर्षांपासून नक्षल चळवळीत होती. नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य भूपती याची ती पत्नी आहे. तिच्यावर २५ लाख रुपयांचे बक्षीस होते. विमला चंद्रा सिडाम उर्फ तारक्का उर्फ वत्सला उर्फ तारा डीकेएसझेडसीएम, सुरेश उईके उर्फ चैतू उर्फ बोटी, डीव्हीसीम कुतुल एरिया कमिटी व त्याची



पत्नी कल्पना गणपती तोर्रेम उर्फ भारती उर्फ मदनी (डीव्हीसीएम), अर्जुन तानू हिचामी उर्फ सागर उर्फ सुरेश डीव्हीसीएम राही दलम व त्याची पत्नी सम्भ पांडू मट्टामी उर्फ बंडी (एसीएम डी. के. झोन डॉक्टर टीम), वनिता सुकलू धुर्वे उर्फ सुशीला (एसीएम भामरागड दलम), निशा बोडका हेडो उर्फ शांती उपकमांडर पेरमिली दलम, श्रुती उलगे हेडो उर्फ मन्ना, सदस्य कंपनी क्रमांक १०, शशिकला पतीराम धुर्वे पश्चिम सबझोनल प्रेस टीम सदस्य, सोनी सुक्कू मट्टामी राही दलम सदस्य, आकाश सोमा पुंगाटी उर्फ वत्ते सदस्य प्लाटून नंबर ३२ यांचा आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये समावेश आहे. संविधानविरोधी आणि देशविरोधी कृत्यामुळे आपला विकास होत नाही, हे नक्षलवाद्यांच्या लक्षात आल्यामुळे अनेक जण देशाची व्यवस्था आणि संविधानावर विश्वास ठेवून मुख्य प्रवाहात येत आहेत.

### चळवळीत एकही नवीन भरती नाही


मागील चार वर्षात नक्षल चळवळीत एकही नवीन भरती झाली नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. याप्रसंगी विविध चकमकींमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणारे पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचाही सत्कार करण्यात आला. ६२ वर्षीय तारक्का नक्षलवाद्यांच्या दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीची सदस्य तसेच दंडकारण्य विभागाच्या वैद्यकीय पथकाची प्रमुख होती. अहेरी तालुक्यातील किष्टापूर येथील मूळ रहिवासी असलेली तारक्का ही मागील ३८ वर्षांपासून नक्षल चळवळीत सक्रिय होती. तिची प्रचंड दहशत होती. अनेक चकमकी आणि खुनांमध्ये तिचा सहभाग होता.

# अमेरिकेत दहशतवादी हल्ला!

## आधी ट्रकने चिरडले; 12 लोकांचा मृत्यू, 30 लोक जखमी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेच्या न्यू ऑर्लियन्स शहरात भयंकर हल्ला झाला असून, यामध्ये किमान १२ जणांचा मृत्यू आणि ३० लोक जखमी झाले आहेत. हल्लेखोराने न्यू ऑर्लिन्समधील बोर्बन स्ट्रीटवर गर्दीत ट्रक घुसवला व नंतर वाहनातून बाहेर पडून गोळीबार करू लागला. याबाबत न्यू ऑर्लियन्स शहर पोलिसांनी माहिती दिली आहे.**



या घटनेबाबत अधिक माहिती अशी की, ही घटना पहाटे 3.15 च्या सुमारास नाइटलाइफ संस्कृतीसाठी प्रसिद्ध बोरबॉन स्ट्रीट आणि इबरव्हिलनजीक घडली. अमेरिकेतील न्यू ऑर्लियन्स शहरातील बोर्बन स्ट्रीटवरील गर्दीत हल्लेखोराने ट्रक घुसवला. यामध्ये वाहनाखाली चिरडले गेलेल्या १२ जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर हल्लेखोराने वाहनातून बाहेर पडत गोळीबार करायला सुरूवात केली. घटनास्थळावरून प्रसिद्ध झालेल्या व्हिडिओमध्ये लोक रस्त्यावर दिसत आहेत आणि गोळीबाराचा आवाज ऐकू येत आहे. जखमी लोक रस्त्यावर किंचाळताना दिसत आहेत. यात अनेकांचा जागीच मृत्यू झाला. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार न्यू ऑर्लिन्स पोलिसांनीही संशयितावर गोळीबार केला. अपघात आणि गोळीबाराच्या घटनेनंतर परिसरात सुरक्षा वाढवण्यात आली असून घटनास्थळी भीतीदायक वातावरण निर्माण झालं आहे. व्हिडिओ आणि फोटोंमध्ये या भागात पोलिसांच्या गाड्या, रुग्णवाहिका दिसत आहेत. स्थानिक अधिकारी या प्रकरणाचा तपास करत आहेत आणि संशयिताला पकडण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. यासह या हल्ल्यात दोन पोलीस अधिकारीही जखमी झाले आहेत. या घटनेवर प्रतिक्रिया देताना न्यू ऑर्लीन्सचे महापौर लाटोया कँट्रेल यांनी हा “दहशतवादी हल्ला” असल्याचे म्हटले आहे. पण, बुधवारी पहाटे ट्रक गर्दीत घुसला तेव्हा नेमकं काय घडले याचा तपास एफबीआयने सुरू केला आहे. बीबीसीच्या वृत्तानुसार, सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या अनेक व्हिडिओमध्ये जमिनीवर अनेक लोक गंभीर जखमी झाल्याचे दिसत आहे. ही घटना घडल्यानंतर न्यू ऑर्लीन्स शहर आपत्कालीन विभागाने एक्सवर पोस्ट करत, कॅनल आणि बोर्बन स्ट्रीटवर मोठा अपघात घडला आहे. या परिसरापासून दूर राहा, असे म्हटले आहे. दरम्यान न्यू ऑर्लीन्स हल्ल्यातील हल्लेखोराचा मृत्यू झाल्याचे एका पोलीस अधिकाऱ्याने सीएनएनला सांगितले. जाणूनबुजून हे कृत्य केल्याचे काही पुरवे सापडल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे. एफबीआय आणि पोलीस संयुक्तपणे या हल्लामागे काय हेतू आहे याचा शोध घेण्यासाठी वाहनाची तपासणी करत आहेत. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, पांढऱ्या रंगाचा ट्रकने बॅरिकेड्स तोडून फुटपाथवरील लोकांना चिरडले. या घटनेवेळी तिथे उपस्थित असलेला २२ वर्षांचा केविन गार्सिया म्हणाला की, बोर्बन फुटपाथच्या डाव्या बाजूला एक ट्रक प्रत्येकाला चिरडत असल्याचे मी पाहिले. यावेळी एक मृतदेह माझ्याकडे दिशेने उडल्याचेही मी पाहिले. यानंतर लगेचच मला आला गोळाबाराचाही आवाज ऐकू आला. याबाबत सीएनएनने वृत्त दिले आहे.या घटनेबाबत अधिक माहिती अशी की, ही घटना पहाटे 3.15 च्या सुमारास नाइटलाइफ संस्कृतीसाठी प्रसिद्ध बोरबॉन स्ट्रीट आणि इबरव्हिलनजीक घडली. अमेरिकेतील न्यू ऑर्लियन्स शहरातील बोर्बन स्ट्रीटवरील गर्दीत हल्लेखोराने ट्रक घुसवला. यामध्ये वाहनाखाली चिरडले गेलेल्या १२ जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर हल्लेखोराने वाहनातून बाहेर पडत गोळीबार करायला सुरूवात केली. घटनास्थळावरून प्रसिद्ध झालेल्या व्हिडिओमध्ये लोक रस्त्यावर दिसत आहेत आणि गोळीबाराचा आवाज ऐकू येत आहे. जखमी लोक रस्त्यावर किंचाळताना दिसत आहेत. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार न्यू ऑर्लिन्स पोलिसांनीही संशयितावर गोळीबार केला. घटनेनंतर जखमींना स्थानिक रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

### फुटपाथवरील लोकांना चिरडले

व्हिडिओ आणि फोटोंमध्ये या भागात पोलिसांच्या गाड्या, रुग्णवाहिका दिसत आहेत. स्थानिक अधिकारी या प्रकरणाचा तपास करत आहेत आणि संशयिताला पकडण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. यासह या हल्ल्यात दोन पोलीस अधिकारीही जखमी झाले आहेत. या घटनेवर प्रतिक्रिया देताना न्यू ऑर्लीन्सचे महापौर लाटोया कँट्रेल यांनी हा “दहशतवादी हल्ला” असल्याचे म्हटले आहे. पण, बुधवारी पहाटे ट्रक गर्दीत घुसला तेव्हा नेमकं काय घडले याचा तपास एफबीआयने सुरू केला आहे. बीबीसीच्या वृत्तानुसार, सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या अनेक व्हिडिओमध्ये जमिनीवर अनेक लोक गंभीर जखमी झाल्याचे दिसत आहे. ही घटना घडल्यानंतर न्यू ऑर्लीन्स शहर आपत्कालीन विभागाने एक्सवर पोस्ट करत, कॅनल आणि बोर्बन स्ट्रीटवर मोठा अपघात घडला आहे.हल्ल्यातील हल्लेखोराचा मृत्यू झाल्याचे एका पोलीस अधिकाऱ्याने सीएनएनला सांगितले.

# पुरुषांनी शर्ट काढून मंदिरात जाणे वाईट

## शिवगिरी मठाच्या प्रमुखांची प्रथा बंद करण्याची मागणी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पुरुषांनी वरचे कपडे (शर्ट) काढून मंदिरात जाणे ही वाईट प्रथा असून, ती आता थांबवली पाहिजे, अशी मागणी केरळमधील शिवगिरी मठाच्या प्रमुखांनी केली आहे. त्यांच्या या मागणीला केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी पाठिंबा दर्शविला आहे. यामुळे सामाजिक क्रांती होईल, असेही मुख्यमंत्री विजयन म्हणाले आहेत.**



शिवगिरी मठात दरवर्षी होणाऱ्या यात्रेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना स्वामी सच्चिदानंद म्हणाले, “ही एक वाईट प्रथा आहे. पूर्वी, ही प्रथा (वरचे वस्त्र काढून मंदिरात जाणे) पुनूल (उच्च जातीच्या लोकांनी परिधान केलेला पवित्र धागा) दिसावा यासाठी सुरू करण्यात आली होती. ती प्रथा आजही मंदिरांमध्ये सुरू आहे. ती प्रथा बदलली पाहिजे, अशी श्रीनारायण समाजाची इच्छा आहे. ही वाईट प्रथा आहे यात शंका नाही. श्री नारायण मंदिरांमध्ये ही प्रथा अस्तित्वात नाही. या संदर्भात बदल करणे आवश्यक आहे.”या यात्रेच्या उद्घाटनप्रसंगी केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयनदेखील उपस्थित होते. यावेळी त्यांनी स्वामी सच्चिदानंतर यांच्या मताचे समर्थन केले. ते म्हणाले, “स्वामींनी जे मत मांडले त्यामुळे मोठी सामाजिक क्रांती होऊ शकते. स्वामींनी गुरूंची उदात्त परंपरा कायम ठेवणारे मत व्यक्त केले आहे. मला खात्री आहे की, अनेक मंदिरे याचे पालन करतील. कोणावरही सक्ती करण्याची गरज नाही. काळाच्या अनुषंगाने अनेक पद्धती बदलल्या आहेत हे वास्तव आहे. श्रीनारायण चळवळीशी संबंधित मंदिरांनी तो बदल स्वीकारला आहे. मला आशा आहे की इतर मंदिरे देखील हा मार्ग अवलंबतील.”

### एक जात, एक धर्म, एक देव

स्वामी सच्चिदानंद हे समाजसुधारक श्रीनारायण गुरु यांनी स्थापन केलेल्या शिवगिरी मठाचे प्रमुख आहेत. समाजसुधारक श्रीनारायण गुरु यांनी “एक जात, एक धर्म, एक देव” या संकल्पनेचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी स्थापन केलेल्या श्री नारायण धर्म संघमचे मुख्यालय देखील शिवगिरीत आहे. कारण, श्रीनारायण गुरु यांनी अंधश्रद्धेविरुद्ध लढा देत मागास जातीतील लोकांना मंदिरात प्रवेश आणि पूजा करण्याचा अधिकार मिळवून दिला होता.

# बघ आला तुझा बाप..; 'देवा' चित्रपटाचं पहिलं पोस्टर प्रदर्शित

कधी 'राजीव माथूर', कधी 'आदित्य कश्यप' तर कधी 'कबीर सिंग'च्या रुपातून प्रेक्षकांची मनं जिंकणारा शाहिद कपूर लवकरच एका नव्या भूमिकेतून भेटीस येत आहे. एका ॲक्शन थ्रिलर चित्रपटात शाहिद पाहायला मिळणार आहे. याचं चित्रपटाचं पहिलं पोस्टर नुकतंच समोर आलं असून यामधील शाहिद कपूरच्या किलर लूकची चर्चा होतं आहे. बॉलीवूडचा 'चॉकलेट बॉय', 'राऊडी हिरो' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाहिद कपूरच्या आगामी चित्रपटाचं नाव 'देवा' असं आहे. या चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. अशातच निर्मात्यांनी 'देवा' चित्रपटाचं पहिलं पोस्टर प्रदर्शित करून



प्रेक्षकांमधील उत्सुकता अजूनच शिगेला पोहोचवली आहे. महत्त्वाचं म्हणजे 'देवा' चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीखदेखील समोर आली आहे.अभिनेता शाहिद कपूरने स्वतःचं 'देवा' चित्रपटाचं पहिलं पोस्टर सोशल मीडियावर शेअर केलं आहे. या पोस्टरमध्ये शाहिद कपूरचा दमदार लूक पाहायला मिळत आहे. फॉर्मल कपडे, डोळ्यावर गॉगल, तोंडात सिगारेट अशा किलर लूकमध्ये शाहिद दिसत आहे. या पोस्टरच्या मागे ९०च्या दशकातील आइकॉनिक, महानायक अमिताभ बच्चन पाहायला मिळत आहेत. शाहिद आणि अमिताभ बच्चन एका पोस्टरमध्ये असल्यामुळे चित्रपटात काहीतरी धमाकेदार असल्याचा इशारा दिला जात आहेत.

## तुम्ही पाहिलाय का 'हॅपी न्यू इयर'?

फराह खानने दिग्दर्शित केलेला शाहरुख खानची मुख्य भूमिका असलेला 'हॅपी न्यू इयर' चित्रपट रिलीज होऊन आता १० वर्षे झाली आहे. त्यावर्षीच्या सर्वाधिक कमाई करणाऱ्यांपैकी एक हा चित्रपट होता. मात्र हा चित्रपट बरीच वर्षे रखडला होता. जवळपास आठ कलाकारांनी सिनेमा नाकारला होता. फराहला ज्या कलाकारांबरोबर सिनेमा करायचा होता, त्यापैकी फक्त एकाच अभिनेत्याने चित्रपटासाठी होकार दिला. बाकी सगळे वेगळे कलाकार होते. हिंदुस्तान टाइम्सच्या वृत्तानुसार, फराह खानने २००४ मध्ये आलेल्या 'मैं हूं ना'च्या यशानंतर 'हॅपी न्यू इयर' बनवायचा ठरवलं होतं. तिला अमिताभ बच्चन, शाहरुख खान, अक्षय कुमार, जुही चावला, मनीषा कोईराला, अमिषा पटेल, प्रियांका चोप्रा, रवीना टंडन आणि झायेद खान यांना सिनेमात घ्यायचं होतं, पण तसंच काहीच घडलं नाही.२००६ मध्ये फराह खानने दीपिका पादुकोणला या चित्रपटासाठी साइन केलं होतं. पण जेव्हा 'हॅप्पी न्यू इयर' नंतर मागे पडला आणि तिने तिला 'ओम शांती ओम'मध्ये घेतलं. 'हॅप्पी न्यू इयर' पुढची ६ वर्षे तसाच राहिला. या काळात फराहने 'ओम शांती ओम' आणि 'तीस मार खां' सारखे चित्रपट केले. २००९ मध्ये शिरीष कुंदरशी भांडण झाल्यावर शाहरुख आणि फराहमध्ये मतभेद झाले होते. आता 'हॅपी न्यू इयर' हा चित्रपट बनणार नाही, असं अनेकांना वाटत होतं. मग २०१२ मध्ये फराह आणि शाहरुखचे मतभेद दूर झाले आणि 'हॅपी न्यू इयर'वर काम सुरू झाले.



## नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी केतकीची वादळी पोस्ट!

आपल्या परखड आणि सडेतोड वक्तव्यासाठी नेहमीच ओळखल्या गेलेल्या केतकीच्या पोस्टची पुन्हा एकदा चर्चा होत असल्याचे दिसून येत आहे. तिनं नव्या वर्षाच्या निमित्तानं शेयर केलेला तो व्हिडिओ नेटकऱ्यांचे, चाहत्यांचे लक्ष वेधून घेताना दिसतो आहे. केतकीनं त्या पोस्टमधून आपल्यावर दोन वर्षांपूर्वी कशाप्रकारे अन्याय झाला, कशाप्रकारे खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आणि ज्यांच्यामुळे ते गुन्हे दाखल झाले त्यांच्याकडून अद्याप कोणत्याही प्रकारची प्रतिक्रिया कशी समोर आली नाही याबाबत परखडपणे मत व्यक्त केले आहे. आपल्या पोस्टमध्ये केतकी म्हणते, नमस्कार मी केतकी चितळे, मी हा व्हिडिओ का करते आहे तर प्रत्येक वर्षी म्हणजे नवीन वर्ष आल्यावर आपल्या प्रत्येकाच्या काही ना काही इच्छा असतात. माझीही एक इच्छा आहे. १४ मे २०२२ साली मला बेकायदेशीर अटक करण्यात आली. तुरुंगात टाकण्यात आले हे सर्वांना माहिती आहे. माझ्याविरोधात राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी तक्रारी नोंदवल्या. माझ्या विरोधात चूकीच्या तक्रारी दाखल केल्या गेल्या. यात जे सेक्शन अस्तित्वातच नाही ते वापरुन माझ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. बरं ज्या तक्रारी नोंदवण्यात आल्या पोलिसांनी बेकायदेशीररित्या त्याचे एफआयआरही लिहिले. जे सेक्शन १६३अ (आयटी) अस्तित्वातच नाही ते लिहिण्यात आले. या सगळ्यात एक व्यक्ती मला दोनशे ठिकाणी फिरवणार होती. पण ती व्यक्ती फारशी महत्वाची नसल्यामुळे आपण त्याच्याबाबत फारसं काही बोलणार नाही. या सगळ्यात ज्या व्यक्तीच्या नावामुळे, त्यांचे नाव वापरुन मला तुरुंगात टाकण्यात आले त्या व्यक्तीचे म्हणणे काय आहे, त्या महापुरुषाचे म्हणणे काय आहे. आपल्या परखड आणि सडेतोड वक्तव्यासाठी नेहमीच ओळखल्या गेलेल्या केतकीच्या पोस्टची पुन्हा एकदा चर्चा होत असल्याचे दिसून येत आहे.



## न्यू इअरच्या पार्टीतून येताच जोरात पडली मौनी

२०२५ या नवीन वर्षाची सुरुवात झाली आहे. जगभरात नवीन वर्षाचं स्वागत जल्लोषात करण्यात आलं. बॉलीवूडचे कलाकारदेखील नवीन वर्षाचं स्वागत धुमधडाक्यात करताना पाहायला मिळत आहेत. ३१ डिसेंबरच्या रात्री सेलिब्रिटींनी ग्रँड स्टाइलमध्ये नवीन वर्ष साजरं केलं. याचे फोटो, व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. अशातच एका अभिनेत्रीच्या व्हिडीओने सगळ्यांचं लक्ष वेधलं आहे. ३१ डिसेंबरच्या रात्री ठिकठिकाणी नवीन वर्षानिमित्ताने पार्टीचं आयोजन केलं होतं. अशाच एका पार्टीतून एक लोकप्रिय अभिनेत्री बाहेर येत असताना जोरात पडली. तिचा हाच व्हिडीओ सोशल मीडियावर सध्या खूप चर्चेत आला आहे.ही लोकप्रिय अभिनेत्री दुसरी-तिसरी कोणी नसून मौनी रॉय आहे. मौनी रॉयने पती सूरज नांबिया आणि दिशा पटानीसह जवळच्या मित्रमंडळीबरोबर नवीन वर्षाचं जल्लोषात स्वागत केलं. याच पार्टीतून बाहेर पडल्यानंतर मौनी रॉय स्वतःला सावरू शकली नाही. व्हायरल व्हिडीओमध्ये काळ्या रंगाचा शॉर्ट ड्रेस आणि हाय हिल्स घालून पार्टीतून बाहेर येताना मौनी रॉय दिसत आहे. यावेळी तिच्या पुढे पती सूरज असून मागे दिशा पटानी पाहायला मिळत आहे. तेव्हाच मौनी हाय हिल्समुळे फुटपाथवर जोरात पडते. हे पाहून लगेच पती सूरज मागे फिरतो आणि मौनीला उचलतो. त्यानंतर तो अभिनेत्रीला सावरत गाडीत बसवतो.

# रोहितच्या पोस्टने वेधले लक्ष!

## भारताने टी-20 विश्वचषकाचे पटकावले जेतेपद

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मेलबर्न बॉक्सिंग डे कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा १८४ धावांनी पराभव केला. त्याचबरोबर चार सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-१ ने आघाडी घेतली आहे. या सामन्यांनंतर भारतीय कर्णधार रोहित शर्माला टीकेचा सामना करावा लागत आहे. अशात २०२४ वर्ष संपण्यापूर्वीच भारतीय कर्णधार रोहित शर्माने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट केली होती, ज्यामध्ये चाहत्यांनी त्याला निवृत्ती न घेण्याचे भावनिक आवाहनही केले आहे.**



### कसोटी क्रिकेटमध्ये ठरला फ्लॉप

भारताने अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ७ धावांनी पराभव करत ट्रॉफीवर दुसऱ्यांदा नाव कोरले. यासह त्याने फलंदाजीतही खास योगदान दिले. तो (२५७) टी-२० विश्वचषक स्पर्धेत संघासाठी सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला होता. त्याने या स्पर्धेत अनेक शानदार खेळ्या साकारल्या होत्या. विशेष म्हणजे त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध ९२ धावांची शानदार खेळी केली होती.रोहित शर्माला कसोटी क्रिकेटमध्ये अपेक्षित यश मिळाले नाही. त्याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने मायदेशात इंग्लंड आणि बांगलादेशविरुद्ध कसोटी मालिका जिंकण्यात यश मिळवले होते. यानंतर न्यूझीलंडविरुद्धची मालिका मायदेशात ०-३ अशी मालिका गमवावी लागली. ज्यामुळे भारतीय संघाला तब्बल १२ वर्षांनंतर मायदेशात कसोटी मालिकेत पराभव पत्करावा लागला.. या व्यतिरिक्त २०२४ मध्ये, तो कसोटी क्रिकेटमध्ये फलंदाज म्हणून पूर्णपणे अपयशी ठरला आहे.

रोहित शर्मासाठी २०२४ हे काही गोड आणि कडू आठवणी देणारे राहिले. त्याने टी-२० क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली असतानाच, तो कसोटी क्रिकेटमध्ये कर्णधार आणि खेळाडू म्हणून पूर्णपणे फ्लॉप ठरला आहे. भारतीय कर्णधार रोहित शर्माने इन्स्टाग्रामवर पोस्ट केले की, 'सर्व चढ-उतार आणि इतर सर्व गोष्टींसाठी सरत्या २०२४ या वर्षाचे आभार'. यासह त्याने हार्ट इमोजीही तयार केला आहे. त्याने पोस्ट केलेल्या व्हिडीओत २०२४ मधील काही खास आठवणी आहेत. ही पोस्ट पहिल्यानंतर चाहते सोशल मीडियावर भावुक झाले आहेत. सूरज बाबा नावाच्या युजरने लिहिले की, 'रोहित भाई, तुम्ही खुश रहा. हीच माझी प्रार्थना आहे आणि निवृत्तीबद्दल बोलू नका. दुसऱ्या एका चाहत्याने लिहिले आहे की, 'आमचा तुमच्यावर विश्वास आहे कॅप्टन.'रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने २०२४ चा टी-२० विश्वचषक जिंकला. भारताने अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ७ धावांनी पराभव करत ट्रॉफीवर दुसऱ्यांदा नाव कोरले. यासह त्याने फलंदाजीतही खास योगदान दिले. तो (२५७) टी-२० विश्वचषक स्पर्धेत संघासाठी सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला होता. त्याने या स्पर्धेत अनेक शानदार खेळ्या साकारल्या होत्या. विशेष म्हणजे त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध ९२ धावांची शानदार खेळी केली होती.रोहित शर्मला कसोटी क्रिकेटमध्ये अपेक्षित यश मिळाले नाही. त्याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने मायदेशात इंग्लंड आणि बांगलादेशविरुद्ध कसोटी मालिका जिंकण्यात यश मिळवले होते. यानंतर न्यूझीलंडविरुद्धची मालिका मायदेशात ०-३ अशी मालिका गमवावी लागली. ज्यामुळे भारतीय संघाला तब्बल १२ वर्षांनंतर मायदेशात कसोटी मालिकेत पराभव पत्करावा लागला.. या व्यतिरिक्त २०२४ मध्ये, तो कसोटी क्रिकेटमध्ये फलंदाज म्हणून पूर्णपणे अपयशी ठरला आहे. त्याने १४ कसोटी सामन्यात अवघ्या ६१९ धावा करता केल्या.रोहित शर्मासाठी २०२४ हे काही गोड आणि कडू आठवणी देणारे राहिले. त्याने टी-२० क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली असतानाच, तो कसोटी क्रिकेटमध्ये कर्णधार आणि खेळाडू म्हणून पूर्णपणे फ्लॉप ठरला आहे.भारतीय कर्णधार रोहित शर्माने इन्स्टाग्रामवर पोस्ट केले की, 'सर्व चढ-उतार आणि इतर सर्व गोष्टींसाठी सरत्या २०२४ या वर्षाचे आभार'. यासह त्याने हार्ट इमोजीही तयार केला आहे. त्याने पोस्ट केलेल्या व्हिडीओत २०२४ मधील काही खास आठवणी आहेत. ही पोस्ट पहिल्यानंतर चाहते सोशल मीडियावर भावुक झाले आहेत. सूरज बाबा नावाच्या युजरने लिहिले की, 'रोहित भाई, तुम्ही खुश रहा. हीच माझी प्रार्थना आहे आणि निवृत्तीबद्दल बोलू नका. दुसऱ्या एका चाहत्याने लिहिले आहे की, 'आमचा तुमच्यावर विश्वास आहे.

# एकच चेंडू खेळला पण दोनदा झाला आऊट

## ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सध्या बांगलादेशमध्ये बांगलादेश प्रीमियर लीग २०२४-२५ चा हंगाम खेळला जात आहे. या क्रिकेट लीगमध्ये एक विचित्र घटना पाहायला मिळाली आहे. वास्तविक, या स्पर्धेतील तिसरा सामना खुलना टायगर्स आणि चितगाव किंग्ज यांच्यात खेळला गेला. या सामन्यात खुलना टायगर्सच्या खेळाडूसोबत असे काही घडले, जे क्रिकेटच्या मैदानावर क्वचितच पाहायला मिळते.**



### खुलना टायगर्स संघाने मारली बाजी

कर्णधार मेहदी त्याच्या अनेक सहकाऱ्यांसह अंपायरकडे गेला आणि त्याच्याशी बोलल्यानंतर टॉम ओ'कॉनेलला परत बोलावले. पण टॉम ओ'कॉनेलला या संधीचा फायदा घेता आला नाही आणि पहिल्याच चेंडूवर तो बाद झाला. म्हणजेच या सामन्यात तो एकच चेंडू खेळू शकला आणि दोनदा बाद झाला.सध्या बांगलादेशमध्ये बांगलादेश प्रीमियर लीग २०२४-२५ चा हंगाम खेळला जात आहे. या क्रिकेट लीगमध्ये एक विचित्र घटना पाहायला मिळाली आहे. वास्तविक, या स्पर्धेतील तिसरा सामना खुलना टायगर्स आणि चितगाव किंग्ज यांच्यात खेळला गेला.

या खेळाडूने सामन्यात केवळ १ चेंडू खेळला, परंतु दोनदा आऊट झाला, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.वास्तविक, २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकादरम्यान टाइमआउटचा वाद प्रकाशझोतात आला होता. श्रीलंकेचा माजी कर्णधार अँजेलो मॅथ्यूजला टाईम आऊट देण्यात आले होते. आयसीसीच्या नियमांनुसार, फलंदाज बाद झाल्यावर तीन मिनिटांत नवीन फलंदाजाला क्रीजवर यावे लागते. त्याचवेळी विश्वचषकात ही वेळ केवळ दोन मिनिटांची होती. मात्र अँजेलो मॅथ्यूजला त्यात अपयश आले होते. आता अशीच एक घटना बांगलादेश प्रीमियर लीगमध्ये चितगाव किंग्जचा खेळाडू टॉम ओ'कॉनेलसोबत घडली आहे. ऑस्ट्रेलियन लेगस्पिनर टॉम ओ'कॉनेल तीन मिनिटे पूर्ण झाल्यानंतर फलंदाजीसाठी मैदानात आला, त्यानंतर त्याला अंपायरने आऊट घोषित केले. यानंतर खुलना टायगर्सचा कर्णधार मेहदी हसन मिराजने टॉम ओ'कॉनेलला पुन्हा फलंदाजीसाठी बोलावण्याचा निर्णय घेतला. यानंतर सर्वजण मेहदी हसन मिराजचे कौतुक करत आहेत.